# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

**मा.राष्ट्रपती महोदय संदर्भ..**

क्र. सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-७१७/१८
दिनांक : ११/०२/२०२० 2256

**प्रति,**
मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण भवन, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई

**विषय :** मौजे माल्वणी मालाड ता. बोरीवली टिपू सुलतान मैदान, लगून रोड, नगर भूमापन क्रमांक २८४१ या ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास करून अवैध बांधकाम करीत असलेबाबत....

**संदर्भ :** १) श्री.रेजी अब्राहम यांचा अर्ज दिनांक २८/०५/२०१८ व दि. २९/०५/२०१८
२) या कार्यालयाचे पत्र दि.०६/०६/२०१८, दि.२१/०७/२०१८, दि. ०७/०९/२०१८ आणि दि.०३/०१/२०१९ दिनांक ०४/०२/२०१९ आणि दिनांक १५/०४/२०१९
३) महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी यांचेकडील पत्र दि. २३/०८/२०१८
४) मा. उच्च न्यायालय, मुंबई पब्लीक ग्रिव्हेन्सेस सेल यांचे पत्र दि.०३/१२/२०१८ सोबत श्री. रेजी अब्राहम यांचा मा. मुख्य न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई यांना अग्रेषित केलेला अर्ज दि. ०१/०८/२०१८
५) महसूल व वन विभाग यांचेकडील दि. ०३/१२/२०१८आणि दि. ०३/०१/२०१९ रोजीच्या पत्रासोबत श्री. रेजी अब्राहम यांचे निवेदन दिनांक ३१/०७/२०१८
६) आपलेकडील पत्र दिनांक १८/०२/२०१९ आणि आपलेकडील अ.शा. पत्र दिनांक ०८/०३/२०१९
७) उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल दि. २८/०५/२०१९ दि. ०१/०८/२०१९ आणि दि. १०/१०/२०१९.
८) उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल दि. ०७/०२/२०२०.

Steno
Reji Abraham Complaint file

मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक - 4626
दिनांक - 12/03/2020
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचा संदर्भिय पत्र क्र १, ३, ४, ५, आणि ६ अन्वये अर्जदार श्री. रेजी अब्राहम यांनी मौजे मालवणी, मालाड (प.) ता. बोरीवली येथील न.भू.क्र. २८४१ टिपू सुलतान मैदान, लगुन रोड या ठिकाणी कादंळवनाचा ऱ्हास करून अवैध बांधकाम करीत असल्याबाबतच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

त्या अनुषंगाने या कार्यालयात आयोजित केलेल्या दिनांक ०४/०२/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांना विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, संबधित तहसिलदार, नगर भूमापन अधिकारी आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची त्यांचे स्तरावर बैठक घेऊन संयुक्त स्थळपाहणी करुन आवश्यकता असल्यास नियमानूसार कारवाई करुन केलेल्या कारवाईचा परिपूर्ण अहवाल आवश्यक त्या कागदपत्रासह या कार्यालयास सादर करण्याकामी दिनांक ०४/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्र. ९ च्या पत्रान्वये अंतरिम अहवाल या कार्यालयास सादर केलेला होता. (प्रत संलग्न)

DCF(M)
VPS 13/3

त्या अनुषंगाने या कार्यालयाकडील दिलेल्या निदे्रशानूसार / सूचनेनूसार उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्र. ७ अन्वये खालीलप्रमाणे अंतिम अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

मौजे मालवणी-मालाड (प) ता. बोरीवली येथील स.नं. २६३पै. क्षेत्र ३०५ हेक्टर ( ३५००० चौ.मी.) इतके क्षेत्र मुंबई मेट्रो टप्पा क्र. २ व ७ करिता तात्पुरत्या स्वरुपात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना या कार्यालयाकडील आदेश क्र. सी.कार्या-७अ/सं.क्र.१७/१६ दिनांक १६/०३/२०१६ अन्वये तात्पुरत्या स्वरुपात वापर करण्यासाठी आगाऊ ताबा दिनांक ०१/०४/२०१६ रोजी शासनाचे अटी व शर्तीस अधिन राहून देण्यात आलेला आहे.

मौजे मालवणी ता. बोरीवली येथील न.भू.क्र. २८४१ टिपू सुलतान मैदाप १ व २, लगून रोड, मालवणी, मालाड (प) येथील एमएमआरडीए-मुंबई मेट्रो टप्पा २ व ७ कास्टिंग यार्डसाठी देण्यात आलेल्या ३५००० चौ.मी. जागेवर बांधकाम करुन कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत श्री. रेजी अब्राहम यांचे तक्रार अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष स्थळनिरीक्षण आणि चौकशी करण्यासाठी २१/०८/२०१९ रोजी उपस्थित राहणेबाबत सर्व संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांना उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील दिनांक ०७/०८/२०१९ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले होते. तसेच तक्रारदार श्री. रेजी अब्राहम यांना देखील वरील कार्यवाहीच्या वेळी उपस्थित राहाण्याबाबत पत्राने कळविण्यात आले होते.

उपरोक्त नमूद स्थळपाहणीच्या दिवशी वेळी तहसीलदार बोरीवली, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, मालवणी पोलीस ठाणे, वनपाल कांदळवन कक्ष, परिरक्षण भूमापक, नगर भूमापन, गोरेगाव व तक्रारदार श्री. रेजी अब्राहम हे दि.२१/०८/२०१९ रोजी हजर होते. सदर स्थळपाहणीच्या वेळी न.भू.क्र.२८४१ अ या मिळकतीच्या सर्वेक्षणासाठी ड्रोण, (Drone) तंत्रज्ञानाची/ मशिनची मदत घेऊन फोटोग्राफी करण्यात आली.

मौजे मालवणी, तालुका बोरीवली, येथील न. भू. क्र. २८४१अ या मिळकतीमधील ३५००० चौ. मी. जागा मुंबई मेट्रोसाठी गर्डर कास्टींगच्या कामासाठी भाडेपट्टयाने देण्यात आली आहे. सदर जागेवर मे. जे. कुमार इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या कंपनीतर्फे काम सुरू आहे. सदर जागेला सर्व बाजूंनी दगडी भिंती तसेच लोखंडी पत्र्याचे कुंपण करण्यात आले आहे. सदर जागेच्या उत्तर पूर्व भागात असलेल्या sedimentation tank मधून पावसाचे पाणी ओवरफ्लो झाल्यामुळे सदरची स्लरी पत्र्यांच्या कुंपणाच्या खालून निघून सदर क्षेत्राच्या पूर्वेस खाडीकडे पसरलेली आहे. त्यामुळे खाडीलगतच्या भागात सिमेंटचा जाड स्तर तयार झालेला आहे. सदरच्या सपाट भागात कांदळवनाचे वृक्ष दिसून आले नाही. सदर भागाच्या पूर्वेस असलेल्या खाडीच्या व दलदलीच्या क्षेत्रात कांदळवनाची मोठी झाडे असल्याचे आढळून असल्याचे आले आहे.

उपरोक्त जागेतून पूर्व-पश्चिम रस्ता गेलेला असून सदर रस्त्याच्या दक्षिणेलगत मोठा मैदानी भाग असून सदर भागास टिपू सुलतान मैदान क्र. २ असे संबोधण्यात येते. सदर मैदानाच्या पूर्व बाजूस खाडीचा भाग असून सदर खाडीच्या क्षेत्रात मोठी कांदळवनाची वृक्ष आहेत. सदर मैदानाच्या दक्षिण-पश्चिम भागात टाटा कंपनीला दिलेल्या जागेत दगड-सिमेंटच्या माध्यमातून चौकोनी बांधकाम सुरू केलेले आहे. त्यामध्ये इलेक्ट्रीक ट्रान्सफॉर्मर

उभारण्यात आला आहे. सदर जागा या कार्यालयाकडील आदेश क्रं. सी/कार्या-३डी/एल-८१/२०१३/८६१, दि.२७/१२/२०१३ अन्वये ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने मे. टाटा पॉवर कंपनी लि.यांना देण्यात आली आहे. ( प्रत संलग्न)

उपरोक्त मोजे मालवणी, मालाड ता. बोरीवली येथील न. भू. क्र. २८४१अ च्या हद्दीमधून लगून रोड गेलेला आहे. सदर रस्त्याच्या पूर्व बाजूस अतिक्रमित दुकानांच्या दक्षिणेस झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण यांनी बांधलेल्या मानवस्थळ सहकारी संस्थेच्या इमारती आहेत. सदर इमारतीच्या पूर्व बाजूस जमिनीवर चाळसदृश्य बांधकाम व वस्ती आहे. सदर जागेवर कोठेही कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून येत नाही. सदर जागेच्या दक्षिणेस पुर्व-पश्चिम दिशेने नाला गेलेला असून सदर नाल्यालगत डेब्रिज टाकण्यात आले आहे. परंतु सदर जागेवर कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त प्रकरणी कांदळवन ऱ्हास तक्रारींच्या अनुषंगाने ड्रोणद्वारे दि. २१/०८/२०१९ रोजी उपरोक्त मिळकतीचे काढण्यात आलेली छायाचित्रे व दि. ०६/१०/२००५ च्या सुमाराची छायाचित्रे यांची तुलना केली असता सन २००५ मधील सदर ठिकाणी असलेले कांदळवन क्षेत्र आज रोजी कमी झालेले दिसून येत नाही. तथापि, सदर जागेवर कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून येत नाही, असा अहवाल या कार्यालयास सादर केला होता.

तथापि, उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी या कार्यालयास सादर केलेल्या अहवालांचे अवलोकन केले. असता सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झाला किंवा नाही ? याबाबत एकवाक्यता दिसून येत नसल्याने या कार्यालयाकडील दिनांक २९/११/२०१९ आणि दि. ०१/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये फेरअहवाल सादर करणेकामी कळविले होते. त्यानूसार उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्रं. ८ अन्वये पुढीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

सदर प्रकरणी विषयांकित मिळकतीचे सर्वेक्षण दिनांक २१/०८/२०१९ रोजी ड्रोन यंत्राद्वारे करण्यात आलेले आहे. सदर मिळकतीची २१/०८/२०१९ रोजी काढण्यात आलेली छायाचित्रे आणि दिनां. ०६/१०/२००५ रोजीचे गुगल छायाचित्रे यांची तूलना केली असता, सन २००५ मधील छायाचित्रांमधील कांदळवन क्षेत्र आजरोजी कमी झालेले दिसून येत नाही. तसेच सदर जागेवर कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसुन येत नाही. तथापि, मौजे मालवणी ता. बोरीवली येथील न.भू.क्र. २८४१ मधील ३.५ हे. आर. इतके क्षेत्र मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणास मुंबई मेट्रोसाठी भाडेपट्याने देण्यात आलेले आहे. तसेच  टाटा कंपनीला इलेक्ट्रीक ट्रान्सफार्मर उभारण्यासाठी ३८५.०० चौ.मी. जागा भाडेपट्याने दिलेली आहे.  तसेच न.भू.क्र. २८४१ च्या हद्दीमधून लगून रोड गेलेला आहे. सदर रस्त्याचे पुर्व बाजूस पुर्वी चाळी होत्या. सदर चाळींचा पुर्नविकास झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरणाकडून करण्यात आला आहे. उपरोक्त तिनही बांधकामे कांदळवनाच्या यन २००५ मधील कांदळवन क्षेत्राच्या ५० मीटरच्या आत आहेत, असा अहवाल सादर केलेला आहे.

उपरोक्त अहवालाचे अवलोकन केले असता, विषयांकित ठिकाणी आजरोजी कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही. मात्र या कार्यालयातर्फे ज्या अटी / शर्तीच्या अधीन राहून मुंबई महानगर प्रादेशिक विकास

प्राधिकरणास मुंबई मेट्रोसाठी भाडेपट्याने जमिन देण्यात आलेली होती. त्या अटी / शर्तींचा भंग झालेला दिसून येत आहे. सबब, विषयांकित प्रकरणी मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांचेकडुन झालेल्या शर्तभंगच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

उपरोक्त प्रमाणे उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल सोबत ड्रोणद्वारे काढण्यात आलेली छायाचित्रे व जागेवर करण्यात आलेला पंचनामा आणि अनुषंगिक कागदपत्रे आपले माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

( वंदना मकू )
**अपर चिटणीस, मुंबई उपनगर**

**स्थळ प्रतिवर मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांची सही असे.**

**प्रत** :१ अवर सचिव, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी, पर्यावरण विभाग, १५ वा मजला, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना माहितीसाठी.

२ सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण समिती तथा उपनवन संरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना माहितीसाठी.